**नियमित दिवाणी दावा नंबर १७/२०१७**

**निशाण १३३**

(CNR No.MHRT080001722017)

## मुद्दे (एल)

१. दावा मिळकती अनु. क्र. १ ते ८ या वादी व प्रतिवादी क्र. १ ते २५ यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्याचे वादी सिद्ध करतो काय ?

२. दावा मिळकत क्र. १ ते ८ त्याचे एकटयाचे मालकीच्या असल्याचे प्रतिवादी क्र. १ सुरेश सिद्ध करतो काय ?

३. दावा मिळकत क्र. ९ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ९/१) ही एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून खरेदी केलेचे वादी सिद्ध करतो काय ?

४. दावा मिळकत क्र. ९ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ९/१) ही मयत अनंत शिंदे याचे एकटयाचे हक्कात होती, असे वादी सिद्ध करतो काय ?

५. होय तर, त्यामुळे मयत अनंत शिंदे याचे वारसांना इतर दावा मिळकतींत हक्क नसलेचे वादी सिद्ध करतो काय?

६. दावा मिळकत क्र. १० ते १२ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ४९/२, ५३/१ व ५३/२) या एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून खरेदी केलेचे वादी सिद्ध करतो काय?

७. दावा मिळकत क्र. १० ते १२ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ४९/२, ५३/१ व ५३/२) या मयत गंगाराम शिंदे याचे एकटयाचे हक्कात होत्या, असे वादी सिद्ध करतो काय ?

८. होय तर, त्यामुळे, सदर गंगाराम शिंदे याचे वारसांना इतर दावा मिळकतींत हक्क नसलेचे वादी सिद्ध करतो काय?

९. मयत गणपत याला १९६२ साली एकत्र कुटुंबाची रक्कम रुपये ३०,०००/- (रुपये तीस हजार) दिलेचे वादी सिद्ध करतो काय ?

१०. होय तर, त्यामुळे सदर गणपत शिंदे याचे वारसांना दावा मिळकतींत हिस्सा नसल्याचे वादी सिद्ध करतो काय?

११. प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. २६ चे हक्कात करुन दिलेले दिनांक २९.०५.२०१५ चे खरेदीखत मुळातच अवैध व बेकायदेशीर असल्याचे वादी सिद्ध करतो काय ?

१२. सदर दिनांक २९.०५.२०१५ चे मिळकत क्र. ८ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ५/२) बाबतचे खरेदीखत बेकायदेशीर असल्याचा हक्कज्ञापन आदेश मिळणेस वादी हक्कदार आहे काय ?

१३. मिळकत क्र. ८ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ५/२) यामध्ये प्रतिवादी क्र. २६ ने बांधकाम केल्याचे वादी सिद्ध करतो काय ?

१४. मिळकत क्र. ८ (मौजे कोंडगांव ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र. ५/२) मधील बांधकाम काढून घेणेकरिता प्रतिवादी क्र. २६ विरुद्ध आदेशात्मक ताकीद मिळणेस वादी हक्कदार आहे काय ?

१५. वादी व प्रतिवादी क्र. १ ते २५ पैकी कोण–कोण व कोण–कोणत्या मिळकतींत हक्कदार आहेत ?

१६. वादी व प्रतिवादींचा दावा मिळकतींत हिस्सा किती ?

१७. काय आदेश व हुकूमनामा ?

BALIRAM DATTATRAYA TARE

Digitally signed by BALIRAM DATTATRAYA TARE
Date: 2023.02.23 12:19:31 +0530

दिनांक २३.०२.२०२३

(ब. द. तारे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख

-:CERTIFICATE:-

Judgment/order/ issues in RCS No. 17/2017)

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. S. Thaware (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 23/02/2023 |
| Order signed by PO. on | :- | 23/02/2023 |
| Order uploaded on | :- | 23/02/2023 |